सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक

# महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

## अमित शाह यांची टीका

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात आले होते. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की, शरद पवार देशाच्या राजकारणातील सर्वांत जास्त भ्रष्टाचारी आहेत. ते भ्रष्टाचाराचे म्होरके आहेत. राज्यातील भ्रष्टाचाराला

......पान २ वर

## पोलिसांना सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांच्या संरक्षणात अडकवले तर नागरिक सुरक्षित कसे राहणार?-आव्हाड

...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,३४० | चांदी ८९,८५०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आपल्या पक्षात वादग्रस्त हिरॉईन घेतली पाहिजे. त्यानिमित्त का होईना पक्षाला लोकप्रियता मिळेल.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी मोठा निर्णय

# जातवैधता प्रमाणपत्रासाठी ६ महिन्याची मुदत वाढ

**मुंबई: मराठा समाजातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठीची मुदत वाढवण्यात आली आहे. आता जात वैधता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केली आहे. यामुळे आता मराठा समाजातील विद्यार्थ्यांना अर्ज दाखल केल्यानंतर ६ महिन्यांचा वेळ मिळणार आहे. या घोषणेनंतर मराठा समाजातील विद्यार्थ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.**



याबद्दल सांगताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी आता अर्ज केल्यापासून सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्रे सादर करू शकतात. मुख्यमंत्री कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्रे मिळविण्यात कोणतीही अडचण येणार नाही. जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यापासून ते आता सहा महिन्यांत सादर करू शकतात, असे मुख्यमंत्री कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक असल्याने शासनाचा निर्णय महत्त्वाचा आहे. दहावी आणि बारावीच्या निकालानंतर जातवैधता प्रमाणपत्रासाठी असंख्य अर्ज येत आहेत. याशिवाय मराठा समाजाला कुणबी नोंदी असलेले कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने पावले उचलली आहेत. मराठा समाजाचे विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज करत आहेत. मात्र, विविध प्रक्रियात्मक अडचणींमुळे जातवैधता प्रमाणपत्रे सादर करण्यास विलंब होत असल्याने प्रवेश प्रक्रिया खोळंबली होती. निर्णयामुळे, विशेषतः मराठा समाजातील विद्यार्थी मराठा कोट्यातून प्रवेश घेतल्यास अर्ज केल्यापासून पुढील सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्रे सादर करू शकतात.

दरम्यान राज्य सरकारने मोफत उच्च शिक्षणासंदर्भात निर्णय घेतला आहे. यामुळे आरक्षणप्राप्त आणि ईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक संस्थांनी शुल्क न आकारण्याचे निर्देश देण्यात आले आहे. हे निर्देश उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाकडून देण्यात आले असल्याचे समोर आले आहे. शिंदे सरकारने घेतलेल्या मोठ्या निर्णयानंतर मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

ठाण्यात शिंदे सेनेच्या घोडदौडीला लागणार ब्रेक

## जिल्ह्यातील भाजपा नेते आणि कार्यकर्त्यांचा सूर

# भाजप आपल्या जागा सोडणार नाही

**ठाणे –ठाणे हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असल्यामुळे आणि सत्तेमध्ये मुख्यमंत्री पदावर आरूढ झालेले एकनाथ शिंदे यांचा वर चष्मा ठाणे जिल्ह्यात आहे. मात्र येणाऱ्या विधानसभेत या शिंदे सेनेच्या घोडदौडीला ब्रेक लागणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. ठाण्यात झालेल्या एका बैठकीत भाजपचे वरिष्ठ नेते रवींद्र चव्हाण हे उपस्थित असताना ठाणे जिल्ह्यामधल्या भाजपच्या कुठल्याही जागा या शिंदे सेनेला दिल्या जाणार नसल्याचा सूर काढल्याने ठाणे जिल्ह्यात जास्तीत जास्त जागा मिळवण्याचा असलेला मनसुबा हा फोल ठरणार की काय असे शक्यता निर्माण झालेली आहे.**

ठाणे जिल्ह्यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असून या बालेकिल्ल्यात जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचा मनसुबा शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांचा आणि खुद्द शिंदे सेना प्रमुख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आहे. मात्र येत्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजप कार्यकर्त्यांची नाराजीचा सूर नुकत्याच झालेल्या ठाण्यामधील एका बैठकीत बाहेर



पडला. माजी मंत्री आणि भाजप नेते रवींद्र चव्हाण हे या बैठकीला उपस्थित होते बैठकीमध्ये भाजप कार्यकर्ते आणि खुद्द रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना आश्वासित करीत सांगितले की, विधानसभेमध्ये कुठल्याही पद्धतीने शिंदे शिवसेनेला भाजपच्या कुठल्याही जागा देणार नाही. तर येणाऱ्या सत्तेत मुख्यमंत्री हा भाजपचाच राहील, असा विश्वास आणि आश्वासन बैठकीत कार्यकर्त्यांना दिले गेले असल्याचे सूत्राकडून समजले आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातील वर्चस्वाला कुठेतरी तडा जाईल असे चित्र आणि भाजप कार्यकर्त्यांचा सुर असल्याचा पाहायला मिळत आहे.

भाजपच्या या बैठकीनंतर शिंदे शिवसेनेचे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय खासदार नरेश मस्के यांनी येणाऱ्या पंधरा वर्षे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच राहतील, असा सूड काढला. परंतु ठाण्यात झालेल्या बैठकीत मात्र माजी मंत्री रवींद्र चव्हाण आणि भाजप कार्यकर्ते यांनी भाजपची एकही जागा शिंदे शिवसेनेला या अन्य मित्र पक्षाला देणार नाही. तसेच राज्यात सत्ता आल्यास सत्तेत भाजपचाच मुख्यमंत्री असेल, असं सांगितल्याने नरेश मस्के यांच्या दाव्याला कुठेतरी भाजप कार्यकर्ते आणि भाजप नेते हे आव्हान देत असल्याचं चित्र पाहायला मिळते. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेत महायुती आणि महाविकास आघाडी अशी लढत होते की महायुती मधील मित्रपक्ष आपापले घरोबा करून निवडणुकी लढतील हे चित्र येणाऱ्या दिवसात स्पष्ट होणार आहे.

याबाबत संजय वाघुले यांना विचारले असताना त्यांनी सांगितले की, आम्ही युतीचा धर्म पाळणार, युतीने निवडून दिलेल्या सर्व उमेदवारांना निवडून आणणार, असा निर्धार या बैठकीत झाला असल्याची माहिती ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले यांनी आमच्या प्रतिनिधी बोलताना दिली.

## ना. अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त...



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मध्यवर्ती कार्यालये ठाणे येथे रक्तदान शिबीर चे आयोजन करण्यात आले होते यावेळी आनंद परांजपे प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच अल्पसंख्याक निरीक्षक नजीब मुल्ला, युवक अध्यक्ष नित्यानंद (वीरू) वागमारे, समीर पेंढारे,संदेश पाटील, रवी पालव यांचा सह आदी मान्यवर उपस्तित होते. (छाया – मनोज सिंह)

## ना. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त...



राज्याचे उपमुख्यमंत्री भाजपचे शिर्षस्थ नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन ठाण्यातील भारतीय जनता पार्टीच्या माजी नगरसेविका स्नेहा रमेश आंब्रे आणि डॉ. सागर रमेश आंब्रे यांनी सोमवारी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात विद्यार्थ्यासाठी मोफत दाखले वाटप शिबिर आणि महिलावगीसाठी माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात आली. (छाया – मनोज सिंह)

थोडक्यात घडामोडी

## बांग्लादेशातील हिंसेचा व्यावसायिकांना फटका

नवी दिल्ली – बांग्लादेशातील हिंसेचा भारतीय व्यावसायिकांना मोठा फटका बसलाय. बांग्लादेशात उसळलेल्या दंगलीमुळे संपूर्ण देशात कर्फ्यू लागू करण्यात आलाय. समुद्रीमार्ग आणि सर्व रस्ते बंद करण्यात आलेत. यामुळे भारतीय व्यापा-यांचं कोट्यवधींचं नुकसान झालंय. दोन्ही बाजूने माल वाहतूक बंद करण्यात आली. माल वाहून नेणारे शेकडो ट्रक सीमेवर अडकून पडलेत. यामुळे व्यापार ठप्प झालाय.

## मोबाईल टॉवर कोसळून ३ घरांचे नुकसान

मुंबई – मुंबईतील भांडुपच्या रमाबाईनगरात मोबाईल टॉवर घरांवर कोसळल्याने ३ घरांचं नुकसान झालंय...मुसळधार पावसामुळे काल मोबाईल टॉवर कोसळला...मोबाईल टॉवर कोसळून घरांचं प्रचंड नुकसान झालंय...या दुर्घटनेत सुदैवाने कुठलीही जीवितहानी झालेली नाही.

## जो बायडेन यांची निवडणुकीतून माघार

नवी दिल्ली – अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली. चार महिन्यात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. बायडेन यांनी निवडणुकीतून माघार घ्यावी, अशी विनंती डेमोक्रॅटीक पक्षाचे नेते आणि समर्थक करत होते. अखेर बायडेन यांनी माघार घेतली. अमेरिका आणि पक्षाच्या हितासाठी निवडणुकीतून माघार घेत असल्याचं बायडेन यांनी स्पष्ट केलंय. आता डेमोक्रॅटीक पक्षाकडून राष्ट्राध्यक्षपदाचा उमेदवार कोण? अशी चर्चा सुरू आहे. यात कमला हॅरिस यांचं नाव आघाडीवर आहे. त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करणं बाकी असल्याचं बोललं जातंय.

## भारतीय मराठा महासंघाकडून ठाणे शहरात छत्रपती संभाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसविण्याची मागणी

टाणे – छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या हिन्दवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती समस्त हिंदूंचे स्फुर्तिदैवत हिंदवी स्वराज्याचे दुसरे पदपादशहा श्रीमंत छत्रपती संभाजीराजे भोसले महाराज यांच्या अतुलनिय शौर्याचे पोवाडे नेहमीच गायले जातात. त्यांचे शौर्य, त्यांचा पराक्रम हिंदू धर्मावरील त्यांची जाज्वल्य आणि कर्तव्यकठोर निष्ठा भारतवर्षातीलच काय पण पृथ्वीतलावरील कोणताही हिंदू धर्माभिमानी व्यक्ती विसरू शकणार नाही ! छत्रपती शिवरायांच्या अकाली निधनानंतर हिंदवी स्वराज्याची धुरा समर्थपणे पेलून अत्यंत बिकट परिस्थितीत मस्तवाल आणि धनाढ्य मोगल सम्राटांशी दोन हात करून स्वराज्याचे रक्षण करतांना छत्रपती संभाजीराजांनी निधड्या छातीने पत्करलेले वीरमरण आठवून आजही समस्त हिंदू समाजाच्या माना नतमस्तक होऊन संभाजी महाराजांच्या चरणी विनम्र अभिवादन करतात, अशा या समस्त महाराष्ट्राचा



अभिमान असलेल्या महापराक्रमी आणि महाबलशाली हिंदू सम्राट श्रीमंत छत्रपती संभाजीराजे भोसले यांचा अश्वारूढ पुतळा आपल्या मराठी संस्कृतिसंपन्न ठाणे शहरात शहराच्या मध्यभागी त्वरित उभारण्यात यावा, जेणेकरून ठाणेकरांच्या आताच्या व यापुढील सर्व पिढ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ऊर्जा प्राप्त होईल अशी भारतीय मराठा महासंघाची आग्रही मागणी आहे ! आज दिनांक २२ जुलै रोजी दुपारी प्रदेश अध्यक्ष **(पान २ वर)**

## पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांना अटक

नवी दिल्ली – पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांना अटक करण्यात आली आहे. दुबई विमानतळावरुन त्यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पाकिस्तानी प्रसारमाध्यमांनी यासंबंधी वृत्त दिलं आहे. राहत फतेह अली खान यांच्या माजी मॅनेजरने केलेल्या तक्रारींच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. सलमान अहमद असं त्यांच्या माजी मॅनेजरचं नाव आहे.



प्राथमिक माहितीनुसार, राहत फतेह अली खान आपल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी संयुक्त अरब अमिराती येथे होते. यावेळी बुर्ज दुबई पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. राहत फतेह अली खान यांच्या माजी मॅनेजरने त्यांच्याविरोधात दुबई आणि इतर शहरांमध्ये तक्रार दाखल केल्या होत्या. या वर्षाच्या सुरुवातीला, फेडरल **(पान २ वर)**

## मुंबईत पुन्हा हिट अँन्ड रन; मुलुंडमध्ये ऑडी कारची दोन रिक्षांना धडक, एकाची प्रकृती गंभीर

मुंबई: मुलुंड कचराभूमी रोड परिसरात सोमवारी सकाळी एका भरधाव ऑडी गाडीने दोन रिक्षांना धडक दिली. त्या अपघातात एकूण चारजण जखमी झाले असून त्यातील एका रिक्षा चालकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

सोमवारी सकाळी सातच्या सुमारास मुलुंड कचराभूमी रोड परिसरात ही घटना घडली. ऑडी चालक भरधाव वेगात या मार्गावरून जात असताना त्याचा गाडीवरील ताबा सुटला. त्यानंतर त्याने दोन रिक्षांना जबर धडक दिली. त्यातील एका रिक्षात दोन प्रवासी होते. त्यांच्यासह दोन्ही रिक्षा चालकही जखमी झाले असून एका रिक्षा चालकाची प्रकृती गंभीर आहे. या सर्वांवर परिसरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. **(पान २ वर)**



आधार फाउंडेशच्यावतीने गुरुपौर्णिमेनिमित्त शिक्षकांचा तसेच दहावी व बारावी मध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तळागाळात काम करणाऱ्या आधार फाउंडेशनच्या माध्यमातून संस्थापिका विद्या ताजणे , सह- संस्थापक एकनाथ ताजणे, ट्रस्टी राकेश चौगुले, श्री रामटेके यांच्या हस्ते शिक्षिका सौ-रिद्धी सावंत यांचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे विद्या तांजणे यांनी दहावीत ५० टक्के परंतु १२ वीत ८० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळवलेल्या सृष्टी क्लासेसच्या मुलांचा सत्कार केला यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अंकिता वस्ते अथर्व ताजणे, ज्योती नलावडे, वर्षा कदम, रेश्मा आडे, भगवान आडे, वृषाली काळण, कोमल, समाधान साळवी, , आदिसह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वाढत्या महागाईबाबत आर्थित सर्वेक्षणात चिंता, कारण काय ?

मुंबई – आर्थिक सर्वेक्षण २०२४ मध्ये महागाईबाबत चिंता व्यक्त करण्यात आलीये. टोमॅटो, कांद्याचे भाव तसेच डाळींच्या वाढत्या महागाईबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. याचे मुख्य कारण आर्थिक सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे, आर्थिक सर्वेक्षण २०२४ जाहीर झाले आहे. चालू आर्थिक वर्षात देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर ६.५ ते ७ टक्क्यांदरम्यान राहण्याचा अंदाज व्यक्ती करण्यात आलाय. महागाईबाबत आर्थिक सर्वेक्षणात चिंता व्यक्त करण्यात आलीये. अन्नधान्याची चलनवाढ कायम असल्याचे सर्वेक्षणात म्हटले आहे. टोमॅटो आणि कांद्याचे भाव वाढत आहेत. तर




डाळींचे दरही वाढत असल्याने चिंता व्यक्त होत आहे. हवामान बदलामुळे या सगळ्या गोष्टी होत असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. एकीकडे उष्णतेमुळे पिकांचे नुकसान होतंय तर दुसरीडे अतिवृष्टीमुळे पीक आणि पुरवठा साखळी प्रभावित होत असल्याचं त्यात म्हटले आहे. **(पान २ वर)**

## अन्नधान्य महागलं

आर्थिक सर्वेक्षणानुसार महागाई वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे अन्नधान्याच्या किमतीत झालेली वाढ आहे. सर्वेक्षणानुसार, आर्थिक वर्ष २०२२ मध्ये ग्राहक अन्न किंमत निर्देशांकावर सर्वोत्तम अन्न महागाई ३.८ टक्के दिसली. जे आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ६.६ टक्क्यांवर आले. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये अन्नधान्य महागाई ७.५ टक्क्यांवर दिसली आहे. अर्थ अन्नधान्याच्या महागाईत गेल्या दोन आर्थिक वर्षांत ९७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. सरकारी आकडेवारीनुसार, जून महिन्यात अन्नधान्य महागाई दर ९.५५ टक्के होता, तर मे २०२४ मध्ये हा आकडा ८.६९ टक्के होता.

## भारतीय मराठा महासंघाकडून ठाणे शहरात छत्रपती संभाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसविण्याची मागणी

**(पान १ वरून)** श्री. महेश कदम यांच्या नेतृत्वाखाली भारतीय मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी ठाण्याचे आमदार व सह्याद्री प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. संजय केळकर यांची भेट घेतली व या विषयाचा पाठपुरावा करून ठाणे शहरात स्वराज्याचे दुसरे छत्रपती हिंदू धर्मरक्षक श्रीमंत संभाजीराजे भोसले यांचा पुतळा योग्य इतमामात बसविण्यात यावा अशी मागणी केली. या मागणीला दुजोरा देतांना आमदार संजय केळकर यांनी सर्वप्रथम भारतीय मराठा महासंघाचे नवनियुक्त प्रदेश अध्यक्ष श्री. महेश कदम यांचे अभिनंदन केले व भारतीय मराठा महासंघाच्या मागणीप्रमाणे छत्रपती संभाजीराजेंचा अश्वारूढ पुतळा ठाणे शहरात बसविण्यासाठी अग्रक्रमाने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. त्याबरोबरच ठाणे जिल्ह्यालाही ऐतिहासिक महत्व असून हा पुतळा बसविल्याने पुढील पिढीसाठी स्वराज्याच्या दैदिप्यमान वाटचालीतील संभाजीमहाराजांचे योगदान अवगत होण्याच्या दृष्टीने मदत होईल असेही प्रतिपादन श्री. संजय केळकर यांनी केले ! या भेटीप्रसंगी श्री. महेश कदम यांचे सोबत भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस व प्रवक्ते श्री. राजन गावंड, राष्ट्रीय कोषाध्यक्ष श्री. राम शिंदे, राष्ट्रीय सचिव श्री. राजेंद्र जगदाळे, राष्ट्रीय सदस्य श्री. संजय पाटील, ठाणे लोकसभा अध्यक्ष श्री. प्रसाद घोरपडे, नवी मुंबई शहर अध्यक्ष ॲड. श्री. अमोल उघाडे, श्री. शरद लोंढे, श्री अथर्व पवार व अन्य सदस्य उपस्थित होते.

## पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांना अटक

**(पान १ वरून)** इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने (FIA) गायकाविरुद्ध मनी लाँड्रिंग आणि करचुकवेगिरीच्या आरोपांची चौकशी सुरू केली होती. मागील १२ वर्षांमध्ये राहत फतेह अली खान यांनी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय मैफिलींमधून सुमारे ८ अब्ज रुपये कमावल्याचा खुलासा त्याने केला होता.

राहत फतेह अली खान आधीच वादात अडकले असताना ही कारवाई करण्यात आली आहे. राहत फतेह अली खान यांचा मारहाण करतानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता, ज्यामुळे खळबळ माजली होती. ज्यामध्ये राहत फतेह अली खान यांनी दारूची बाटली हरवल्यावरुन एका बँड सदस्यावर कथितपणे हल्ला केला होता.

## मुंबईत पुन्हा हिट अँन्ड रन; मुलुंडमध्ये ऑडी कारची दोन रिक्षांना धडक, एकाची प्रकृती गंभीर

**(पान १ वरून)** घटनेनंतर ऑडी चालकाने गाडी घटनास्थळी सोडून पोबारा केला आहे. मुलुंड पोलिसांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत, ऑडी गाडी ताब्यात घेतली असून चालकाचा शोध सुरू केला आहे.

## वाढत्या महागाईबाबत आर्थित सर्वेक्षणात चिंता

**(पान १ वरून) महागाई वाढण्याचे कारण काय? –** आर्थिक सर्वेक्षणात महागाईला हवामान बदल जबाबदार असल्याचे म्हटले गेले आहे. देशाच्या विविध भागात वाढती उष्णता, जास्त पाऊस, अवकाळी पाऊस, गारपीट आणि दुष्काळ यामुळे अन्नधान्याच्या किमती वाढल्याचे आर्थिक सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे. अतिउष्मा आणि अतिवृष्टीमुळे पिकांची नासाडी होत असल्याने भाजीपाल्याचे दर वाढल्याचे सर्वेक्षणात म्हटलंय. कांदा आणि टोमॅटोच्या दरात झालेली मोठी वाढ देखाल यासाठी जबाबदार आहे. डाळींचे गेल्या दोन वर्षांत उत्पादन कमी झाले आहे आणि दरात वाढ झाली आहे.

जून महिन्यातील महागाईची आकडेवारी जुलैमध्ये समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जूनमध्ये किरकोळ महागाईचा दर पाच महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, भारतातील किरकोळ महागाई दर ५.०८ टक्के होता. तर मे महिन्यात किरकोळ महागाई दर ४.७५ टक्के होता. जे सुमारे वर्षभरातील नीचांकी पातळीवर होते. मे महिन्यात महागाईचा दर ४.८३ टक्के होता.

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सुचना**

सार्व. बांधकाम विभाग या विभागातर्फे वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत "रस्ते दुरुस्ती" या लेखाशिर्षका अंतर्गत वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातील विविध रस्त्यांवरील दगड व रॅबीट उचलणे या एक कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि. २३/०७/२०२४ ते ३०/०७/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळावर दि.३०/०७/२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि.३१/०७/२०२४ रोजी १६.३० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-व.प्र.स/१६४/२०२४-२५ सही/-
दि:२२.०७.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**विद्युत विभाग**

निविदा सूचना क्रमांकः- ठा.म.पा./विद्युत/नि.सू./११/२०२४-२०२५

ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकिय भवनात आवश्यकतेनुसार नवीन विद्युतीकरण व नूतनीकरण करणे, नौपाडा कोपरी प्रभाग समिती अंतर्गत हाजुरी येथील रेंटल इमारतीमधील उद्वाहनांकरीता उद्वाहन चालक पुरविणे, माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत रेंटल हाउसिंग प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या विविध इमारतीमधील उद्वाहनांकरीता उद्वाहन चालक पुरविणे, दिवा प्रभाग समिती अंतर्गत दोस्ती शिळ रेंटल इमारतीमधील उद्वाहनांकरीता उद्वाहन चालक पुरविणे, ठाणे महानगरपालिकेच्या रेंटल हाऊसिंग व संक्रमण शिबीर प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या गोदावरी सदन, कावेरी सदन आणि मॅजेस्टिक रेंटल इमारतीमधील उद्वाहनांकरीता उद्वाहन चालक पुरविणे, लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत दोस्ती वर्तकनगर रेंटल इमारतीमधील उद्वाहनांकरीता उद्वाहन चालक पुरविणे, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कारंजा व धबधब्यांची वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती करणे व ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी मेडिकल कॉलेज, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा व मिनाताई ठाकरे नर्सिंग कॉलेज व वसतीगृह खोपट येथील Fire Detection System यंत्रणेची वार्षिक निगा देखभाल व दुरुस्ती करणे या आठ कामाकरिता निविदा ई-टेंडरिंग पद्धतीने दि. २३/०७/२०२४ ते दि. ३०/०७/२०२४ या कालावधीत मागविण्यात येत आहे. निविदा ई-टेंडरिंग पद्धतीने https://mahatenders.gov.in वर दि. ३०/०७/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व दि. ३०/०७/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता उघडण्यात येईल. निविदा सूचना व निविदा प्रपत्र https://mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/१६१/२०२४-२५ सही/-
दि:२२.०७.२०२४ उपनगर अभियंता (विद्युत)
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## अमित शाह यांची टीका

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात आले होते. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की, शरद पवार देशाच्या राजकारणातील सर्वांत जास्त भ्रष्टाचारी आहेत. ते भ्रष्टाचाराचे म्होरके आहेत. राज्यातील भ्रष्टाचाराला पवारांनी संस्थात्मक स्वरूप दिले. अमित शाहांनी टीका केल्यानंतर याचे पडसाद राज्याच्या राजकारणावर उमटले आहेत. खरे तर शरद पवार यांच्यावर टीका केल्याशिवाय कोणत्याही नेत्याला प्रसिद्धी मिळत नाही, असेच दिसते. शरद पवारांवर टीका करत अनेक जण राजकारणातून बाद झाले, परंतु त्यांच्यावरील टीकेचा सिलसिला बंद होत नाही. याला उत्तर म्हणून महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही अमित शाह आणि भाजपावर टीका केली आहे. एवढेच नव्हे तर अमित शाहांच्या या वक्तव्यावर अजित पवार गटातील आमदारांनीही नाराजी व्यक्त करून महायुतीला घरचा आहेर दिला आहे. परंतु, याबाबत अजित पवारांना पत्रकारांनी विचारले असता त्यांनी यावर काहीही बोलायचे नाही अशा शब्दांत उत्तर देत या वादातून बाजूला गेले आहेत.

आरोप – प्रत्यारोप करणे महाराष्ट्रातील नेत्यांना नित्याचे झाले आहे. यात भाजपाचे नेते गप्प कशाला बसतील ? भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश अधिवेशनात अमित शहा यांनी पवार, ठाकरे आणि राहुल गांधींचा नेहमीप्रमाणे समाचार घेतला. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत राज्यासाठी केलेल्या कामांची आणि निधीची यादी सादर करताना केंद्रात आणि राज्यात सत्ता असताना, शरद पवार यांनी दहा वर्षांत काय केले, याचा हिशोब द्यावा, असे आव्हान अमित शाह यांनी दिले. अमित शाहांच्या या जहरी टीकेनंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी भाजपावर टीका केली. अजित पवार राष्ट्रवादी गटातील आमदारांनी शरद पवारांवरील टिकेबाबत नाराजी व्यक्त केली. तर अजित पवारांनी या प्रकरणावर बोलण्याचे टाळले आहे.

अजित पवारांनी या प्रकरणावर भूमिका स्पष्ट केली नसली तरीही अजित पवार गटातील आमदारांनी नाराजी व्यक्त केली आहे. भाजपाने केलेली टीका योग्य नसल्याचे मत अजित पवारांचे कट्टर समर्थक विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केले आहे. ते पिंपरी–चिंचवडमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते. आमदार बनसोडे म्हणाले, शरद पवार हे देशाचे नेते आहेत. ते भाजपानेही कबुल केलेले आहे. भाजपाने शरद पवारांचा आदरच केला पाहिजे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील शरद पवार हे माझे गुरू आहेत, असे म्हटले होते. यावरून भाजपा नेते अमित शहा यांनी जे वक्तव्य केले आहे, ते योग्य नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवारांवर केलेला आरोप खोडसाळपणाचा आणि प्रचारकी थाटाचा वाटतो.

अमित शाहांनी शरद पवारांवर टीका केल्यानंतर यावर बच्चू कडू यांनीही प्रतिक्रिया देत म्हटले आहे, शरद पवार जर भ्रष्टाचाराचे सरदार असतील तर मग लोक विचारणार की अजित पवार कोण आहेत? सरदारांचे पुतणे आहेत की कोण आहेत? त्यामुळे अमित शाह विसरभोळे झाले असावेत. अमित शाह असे वादग्रस्त वक्तव्य करतात आणि त्यांच्या अंगलट येते.

अमित शाह यांनी आतापर्यंत बरीचशी उलट सुलट विधाने केली आहेत. विरोधकांना नामोहरम करणे तसेच त्यांची लक्तरे वेशीवर टांगणे हे अमित शाह यांना चांगले जमते. परंतु अमित शहा यांनी आपण केंद्रीय मंत्री आहोत याचे भान ठेवले पाहिजे. अन्यथा त्यांच्याबद्दल बोलताना कोणी आदर ठेवणार नाही. कारण दुसऱ्याला आदर दिला तरच आपल्याला आदर मिळतो. अमित शहा यांची पार्श्वभूमी पाहिली तर ती वादग्रस्त आहे. परंतु केंद्र सरकारमध्ये ते मंत्री झाल्यावर गुजरात व दिल्ली न्यायालयाने त्यांच्या हिताचे निर्णय घेतले असे वाटते. त्यामुळे अमित शाह आता फारसे चर्चेत नाहीत. परंतु मोठ्या पदावरील व्यक्तीने काय बोलावे, काय नाही याचे भान नेहमी ठेवले पाहिजे. सद्यस्थितीत अशा नेत्यांमुळे बाकीचे नेतेही बाष्कळ बडबड करतात असे दिसून आले आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी उमेदवारांना तिकीट देताना बाष्कळ बडबड करणाऱ्या नेत्यांना उमेदवारी दिली नाही. असे असताना अमित शाह नेमकी कोणती परंपरा जपत आहेत ? तसेच अशी विधाने करून त्यांच्या पक्षाला काय साध्य करायचे आहे, हेही समजत नाही. दुसऱ्यावर टीका करून कोणी स्वतः मोठे बनत नाही हे भाजपने लक्षात ठेवावे आणि मगच इतरांवर टीका करावी. शरद पवार यांच्यावर आत्ताच आरोप होत नाहीत तर गेली पंचवीस – तीस वर्षांपासून त्यांच्यावर आरोप होत आहेत. परंतु पवारांवरील आरोप कधी सिद्ध झाले नाहीत किंवा शरद पवार कोणत्याही प्रकरणात अडकले नाहीत. त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी असले टुकार धंदे बंद करण्याची अपेक्षा आहे. अन्यथा महाराष्ट्रातील भाजपच्या नेत्यांनाही तशीच सवय लागण्याचा धोका दिसतो आणि पक्षाची शिस्त बिघडू शकते. पक्षाची शिस्त बिघडली तर जनमानसात पक्षाचे महत्त्व शिल्लक राहत नाही. त्यामुळे भाजपा नेत्यांनी जपून बोलावे, असे वाटते.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७ /मोप्र–१/दि. ३०/११/२०१८ चे प्रपत्र

**मृद व जलसंधारण विभाग**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे. यांचे कार्यालय**
**कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, जुना मुंबई– पुणे रोड, कळवा (प)**
दूरध्वनी क्रमांक – ०२२–२५४२८१२७ ई–मेल eemilsdnt@gmail.com

**ई–निविदा सुचना क्र. ब–१/०८/ सन २०२४–२५**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा–ठाणे, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडील उचित वर्गवारीतील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब – १ नमुन्यातील ई– निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा – ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारण्यात येणार नाही.

कामाचे नांव :– १) मौजे बोरीवली, ता. शहापूर, जि. ठाणे येथे गेटेड सिमेंट काँक्रीट बंधारा बांधणे.
निविदेची अंदाजित किंमत :– :– १) रु.३३,८७,५७६/–
ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक : २३/०७/२०२४ ते दिनांक : ०६/०८/२०२४.
ई–निविदा भरण्याचा कालावधी :– दिनांक : २३/०७/२०२४ ते दिनांक: ०७/०८/२०२४.
ई–निविदा उघडणे :– दिनांक : ०९/०८/२०२४ (शक्य झाल्यास)
खालिल ठिकाणी ई–निविदा बाबतची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल )
२. संकेतस्थळ जाहिरातीची माहिती http://www.cemilspn.in
३. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांचे कार्यालयातील सुचना फलकावर.

जा.क्र. जिजअ/मृवजवि/ठाणे/लेशा–१/२०१२/२०२४
दिनांक :– १५/०७/२०२४
कार्यालय, जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग, कळवा–ठाणे

सही/–
फरीद खान
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग
कळवा– ठाणे

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**समाज विकास विभाग**
**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरिता विविध कल्याणकारी योजनांबाबत**
**जाहिर सुचना**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये योजना राबविण्यात येत आहेत. ठाणे महानगरपालिका हद्दीत रहिवाशी असणा-या दिव्यांग व्यक्तींना योजनेचा लाभ घेण्याकरिता खालील योजनांची मुदत दि.२४/०७/२०२४ ते दि.२३/०८/२०२४ पर्यंत राहिल. ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज उपलब्ध करुन ठेवण्यात आलेले आहेत. परिपूर्ण भरलेले अर्ज दि.२५/०७/२०२४ ते दि.२६/०८/२०२४ रोजी सायं. ५:३० वाजेपर्यत प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. (**योजना क्र.१६-निरामय आरोग्य विमा योजनेची कार्यवाही करणे.**) (मतिमंद, आत्ममग्र, मेंदूचा पक्षाघात झालेली व्यक्ती व बहुविकलांग व्यक्ती यांचेकरिता) या योजनेची मुदत दि.२८/०२/२०२५ पर्यत राहिल. योजना क्र.१६ वगळता एका लाभार्थ्यास एकाच योजनेचा लाभ घेता येईल कृपया याची नोंद घ्यावी.

**समाज विकास विभागाकडून दिव्यांग व्यक्तींसाठी पुढील कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.**

| अ.क्र | योजना क्र. | योजनेचे नाव |
|---|---|---|
| १. | १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. |
| २. | २ | दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. |
| ३. | ३ | दिव्यांग व्यक्ती/विद्यार्थी यांना जिल्हास्तर खेळाडुकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. |
| ४. | ४ | दिव्यांग व्यक्ती /विद्यार्थी यांना राज्यस्तर खेळाडुकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. |
| ५. | ५ | दिव्यांग व्यक्ती /विद्यार्थी यांना राष्ट्रीयस्तर खेळाडुकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. |
| ६. | ६ | दिव्यांग व्यक्ती /विद्यार्थी यांना आतंरराष्ट्रीयस्तर खेळाडुकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. |
| ७. | ७ | दिव्यांग व्यक्तींना उदरनिर्वाह करण्यारिता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (NEFT/ RTGS/ ECS) व्दारे जमा करणे. |
| ८. | ८ | दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (NEFT/ RTGS/ ECS) व्दारे जमा करणे. (कमाल मर्यादा २५,०००/-) |
| ९. | ९ | दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग सहाय्यभूत साहित्य खरेदी करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (NEFT/ RTGS/ ECS) व्दारे जमा करणे. (कमाल मर्यादा २५,०००/-) |
| १०. | १० | दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय खर्चाकरीता निधी उपलब्ध करुन देणे. (एकूण औषधोपचाराच्या ५०% रक्कम किंवा ५०,०००/- यापैकी जे कमी असेल ते) |
| ११. | ११ | दिव्यांग बेरोजगारांना भत्ता / अर्थसहाय्य देणे. |
| १२. | १२ | दिव्यांग व्यक्तीच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे. |
| १३. | १३ | ६० वर्षावरील दिव्यांगाना उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य देणे. |
| १४. | १४ | दिव्यांग व्यक्तीच्या बचत गटांना अर्थसहाय्य देणे. |
| १५. | १५ | कुष्ठरुग्णांना उदरनिर्वाहासाठी अनुदान देणे. |
| १६. | १६ | निरामय आरोग्य विमा योजनेची कार्यवाही करणे. (मतिमंद, आत्ममग्र, मेंदूचा पक्षाघात झालेली व्यक्ती व बहुविकलांग व्यक्ती यांचेकरिता) |

**टिप**:- ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात दिव्यांग कल्याणकारी योजनेचे वरील कालावधीमध्ये अर्ज उपलब्ध असून सदरचे अर्ज पुर्ण विहित कालावधीत भरुन संबंधित प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. विविध योजनांचे छापील अर्जावर अनुक्रमांक देण्यात आला असल्याने सदर अर्जाचाच स्विकार केला जाईल. झेरॉक्स अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने**.

ठामपा/पिआरओ/समाज/१६८/२०२४-२५ **सही/-**
दि:२२.०७.२०२४ उप आयुक्त
**pls visit our oficial web-site** समाज विकास विभाग
**www.thanecity.gov.in** ठाणे महानगरपालिका,ठाणे

### पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. ०२२–२७४५२२३३ Email: panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.३१९/३२०/२०२४ दिनांक :– २२/०७/२०२४

**अग्निशमन विभाग**
**अंदाज दरपत्रके मागविण्यास सुचना**

पनवेल महानगरपालिका खालील कामासाठी इच्छुक संस्था यांचेकडून जाहिर माहोरबंद अंदाज दरपत्रके मागवित आहेत. इच्छुकांनी परिपुर्ण भरलेली अंदाज दरपत्रके सीलबंद करुन दिनांक२३/०७/२०२४ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत महापालिकेच्या अग्निशमन विभागात सादर करावीत. सदर तारखेनंतर प्राप्त झालेली कोणतीही दरपत्रक स्वीकारले जाणार नाही. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ०१/०८/२०२४ रोजी उप आयुक्त यांच्या दालनात दरपत्रक धारक अथवा त्यांचे समक्ष सायं. ०४.०० वा. उघडणेत येतील.

पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामधील कर्मचारी यांना गणवेश खरेदी करणेकामी.

| अ. क्र. | साहित्याचे नाव | साहित्याचे वर्णन | नग | दर प्रती नग जी.एस.टी.सह |
|---|---|---|---|---|
| | | अधिकारी वर्ग | | |
| | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | | | |
| | अग्निशमन केंद्र अधिकारी | | | |
| | उप अग्निशमन केंद्र अधिकारी | | | |
| 1 | Trouser | Navy blue, sapphire cloth trouser of Raymond make quality (code) No. 415384, shade No. 009 with big Loop for the belt. | 1 | |
| 2 | Shirts | Raymond Make (Trovin) Code No. 2073903, shade No. 001 (white) tucking shirt (half sleeves) with 2 breast pocket, shoulder flaps, liberty collar. | 1 | |
| 3 | Socks | Navy blue socks best quality Nylon. | 1 pair | |
| 4 | Impeller (Large Small ) | White metal, plain chromium plated, high qlty. (size-1", 3/4" & 1/4" ) | 1 | |
| 5 | Gogets Patches | As per sample | 1 | |
| 6 | Black Leather Shoes | Ox port pattern/ Ambassador Shoes Bata Black Leather Shoes. | 1 pair | |
| 7 | Big Buttons | 1" diameter, size with PMC FIRE service monogram, button brass, chromium plated, big size. | 1 | |
| 8 | Small Buttons | 1x4 diameter as stated above, necessary, PMC Embossed super fine qlty. grass metal. | 1 | |
| 9 | Whistle with lanyard | Whistle lanyard 38" length. Navy Blue colour single line. | 1 | |
| 10 | Ceremonial Parade Uniform - Blue Shirt, Trousers, Bush Coats, P-Cap. | Navy blue sapphire cloth Reymond make quantity no.415384 shade no.009. | 1 | |
| 11 | T - Shirts | Cotton T-shirt with print PMC monogram/emblem on pocket and PMC words on back of the T-shirt. | 1 | |
| 12 | P.T. Shoes | Bata Make | 1 pair | |
| 13 | Half Paint | As per sample | 1 | |
| 14 | Fire Tunic Uniform | Fire resistant Material use full uniform (use in fire and resque call only) | 1 pair | |
| | | कर्मचारी वर्ग | | |
| | लिडींग फायरमन | | | |
| | फायरमन | | | |
| | यंत्र (वाहन) चालक | | | |
| 1 | Trouser | Navy blue, sapphire cloth trouser of Raymond make quality (code) No. 415384, shade No. 009 with big Loop for the belt. | 1 | |
| 2 | Leather Shoes | Ox port pattern/ Ambassador Shoes Bata Black Leather Shoes. | 1 pair | |
| 3 | Barried Cap | PMC Monogram with satin jari embroidery. | 1 | |
| 4 | Shirts | White Raymond Make (Trovin ) code no. 2073903 tucking shirts with two breast pockets, shoulder flaps, liberty collar. | 1 | |
| 5 | Socks | Navy blue socks best quality Nylon. | 1 pair | |
| 6 | Forge Cap | Navy blue best quality cap with same cloth material of Trouser. | 1 | |
| 7 | Big Button | 1" diameter with service monogram, brass metal big size. | 1 | |
| 8 | Small Button | 1x4 diameters as stated above, necessary, PMC Embossed super fine qlty. grass metal. | 1 | |
| 9 | P-Cap | Blue color woolen plastic pick, plain polished, heavy quality leather adjustable brass, 3.5 and 2.5 sizes. Removal of name. | 1 | |
| 10 | Lanyard with whistle | Whistle Lanyard 38" length Navy Blue color - single line. | 1 | |
| 11 | T-Shirt (Cotton) | Cotton T-shirt with print PMC monogram/emblem on pocket and PMC words on back of the T-shirt. | 1 | |
| 12 | P.T. Shoes | Bata Make | 1 pair | |
| 13 | Half Paint(Cotton) | As per sample | 1 | |
| 14 | Fire Tunic Uniform | Fire resistant Material use full uniform (use in fire and resque call only) | 1 pair | |

अटी व शर्ती :–

१) सर्व नमूद जीएसटी / व्हॅट / वाहतूक खर्च यांसह नमूद असावेत.
२) सदरकामी वापरण्यात येणारे साहित्य चांगल्या प्रतीचे वापरले जावे.
३) या कामी निव्वळ अदांजिय दरपत्रके मागणी करीत असल्याने या बाबत निविदाधारकाच्या कोणत्याही अटीस सदरचा विभाग बांधिल असनार नाही.

जा.क्र./पमपा/अग्नि/२६२१/प्र.क्र.१५/२२०७/२०२४
दिनांक :– २२/०७/२०२४
ठिकाण :– पनवेल महानगरपालिका, पनवेल.

सही/–
(कैलास गावडे)
उपआयुक्त (मुख्यालय–I)
पनवेल महानगरपालिका

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -
■ क्रीडा पात्रता: ऍथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/




■ जागा : १५२
■ पदाचे नाव तपशील:
१ विद्याशाखांचे डीन
२ प्राध्यापक
३ सहयोगी प्राध्यापक / उप ग्रंथपाल
४ सहयोगी प्राध्यापक / सहयोगी ग्रंथपाल
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) संबंधित विषयात Ph.D. /55% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) संबंधित विषयात Ph.D. (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: संबंधित विषयात Ph.D+५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+ पुस्तक ०७ प्रकाशने+ ०८ वर्षे अनुभव+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी + ०८ वर्षे अनुभव
पद क्र.४: ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: खुला प्रवर्ग: ५००/- मागासवर्गीय: २५०/-
■ भरलेले अर्ज सादर करण्याचा पत्ता: The Registrar, University of Mumbai, Room No. 25, Fort, Mumbai-400032
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ ऑगस्ट २०२४
■ वेबसाईट https://mu.ac. in/

## महाराष्ट्र अग्निशमन सेवा

■ उपलब्ध पाठ्यक्रम (कोर्स):
अ. क्र. कोर्सचे नाव पद संख्या कालावधी
१ अग्निशामक (फायरमन) कोर्स - ०६ महिने
२ उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी कोर्स ४० ०१ वर्षे
■ शैक्षणिक पात्रता:
अग्निशामक (फायरमन): ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/EWS: ४५%गुण
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: ५०% गुणांसह पदवीधर SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/EWS: ४५%गुण
■ शारीरिक पात्रता:
कोर्सचे नाव उंची वजन छाती
अग्निशामक (फायरमन) १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी
■ वयाची अट: १५ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC/EWS: ०३ वर्षे सूट
अग्निशामक (फायरमन): १८ ते २३ वर्षे
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: १८ ते २५ वर्षे
■फी : कोर्सचे नाव खुला प्रवर्ग राखीव प्रवर्ग
अग्निशामक (फायरमन) ६००/- ५००/-
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी ७५०/- ६००
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी: २३ सप्टेंबर २०२४ पासून
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://mahafireservice.gov.in/

## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक
■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. Physics and Mathematics. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.
■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.
■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ५५०/- + GST
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४
■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून
■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

## भारतीय स्टेट बँक

■ पदाचे नाव तपशील:
१ सेंट्रल रिसर्च टीम (Product Lead)
२ सेंट्रल रिसर्च टीम (Support)
३ प्रोजेक्ट डेवलपमेंट मॅनेजर (Technology)
४ प्रोजेक्ट डेवलपमेंट मॅनेजर (Business)
५ रिलेशनशिप मॅनेजर
६ तज्ञ वेल्थ
७ रिलेशनशिप मॅनेजर (Team Lead)
८ रीजनल हेड
९ इन्वेस्टमेंट स्पेशलिस्ट
१० इन्वेस्टमेंट ऑफिसर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) MBA/PGDM/PGDBM/C-/CF- (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) पदवी/पदव्युत्तर पदवी (Commerce/Finance/ Economics/Management/Mathematics/Statistics) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) MBA/MMS/PGDM/ME/M.Tech./BE/B.Tech./PGDBM² (ii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) MB-/PGDM/PGDBM² (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) पदवीधर (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) पदवीधर. (ii) ०६ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) पदवीधर. (ii) ०८ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) पदवीधर. (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM/PGDBM/CA/CFA (ii) NISM 21- प्रमाणपत्र (iii) ०६ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) MA/PGDM/PGDBM/CA/CFA (ii) NISM 21- प्रमाणपत्र (iii) ०४ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ एप्रिल २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३० ते ४५ वर्षे
पद क्र.२: २५ ते ३५ वर्षे
पद क्र.३: २५ ते ४० वर्षे
पद क्र.४: ३० ते ४० वर्षे
पद क्र.५: २३ ते ३५ वर्षे
पद क्र.६: २६ ते ४२ वर्षे
पद क्र.७: २८ ते ४२ वर्षे
पद क्र.८: ३५ ते ५० वर्षे
पद क्र.९: २८ ते ४२ वर्षे
पद क्र.१०: २८ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/EWS: 750/- SC/ST/OBC/PWD: फी नाही
■ अधिकृत वेबसाईट https://sbi.co.in/

## भारतीय सैन्य एनसीसी स्पेशल एंट्री स्कीम

■ कोर्सचे नाव: NCC स्पेशल एंट्री स्कीम एप्रिल २०२५-५७ कोर्स
पदाचे नाव तपशील:
१ NCC स्पेशल एंट्री (पुरुष) ७०
२ NCC स्पेशल एंट्री (महिला) ०६
■ शैक्षणिक पात्रता:
NCC "C' Certificate Holders: (i) ५०% गुणांसह पदवीधर (ii) ०२ वर्षे NCC मध्ये सेवा (iii) NCC प्रमाणपत्र.
Ward of Battle Casualties of Army Personnel: ५०% गुणांसह पदवीधर.
वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००० ते ०१ जानेवारी २००६ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://indianarmy.nic.in/

## रक्तदान करण्यासाठी पुढाकार घ्यावा : प्रबोध डावखरे नोट्रो जिम चे संचालक

ठाणे : दानात दान रक्तदान अस बोलले जात असले तरी, रक्ताचा तुटवडा नेहमीच भासत असतो. तुमच्या एका रक्ताच्या बाटलीने कोणाचा तरी जीव वाचणार आहे. मग तो एक सामान्य नागरिक असेल अथवा देशाचं संरक्षण करणारा जवान. त्यामुळे रक्तदानाचे महत्व ओळखून, नागरिकांनी रक्तदान करण्यासाठी पुढे यावे. असे प्रतिपादन.... प्रबोध डावखरे यांनी केलं.
वसंत डावखरे फाऊंडेशन अणि नायट्रो फिटनेस यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे ठाण्यात आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला होता. सुमारे १५० व्यक्तींनी रक्तदान केले. जमा झालेल्या रक्ताच्या बाटल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिकां पर्यंत पोहोचल्या तर ते आमच्यासाठी वेगळा आनंद असेल.... संस्थापक श्री .प्रबोध वसंत डावखरे ज्युपिटर हॉस्पिटलने रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी मोठे परिश्रम घेतले होते...

# टिटवाळ्यातील 'त्या' अपघातग्रस्त कुटुंबियांच्या पाठीशी शिवसेना ठामपणे उभी

## शिवसेना आमदार आणि शहर प्रमुखांनी केले पाटील कुटुंबीयांचे सांत्वन

टिटवाळा - शिर्डीला जाणाऱ्या साई पालखीमधील टिटवाळ्याच्या तिघा साईभक्तांचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. या कुटुंबियांची शिवसेनेचे आमदार विश्वनाथ भोईर आणि कल्याण शहरप्रमुख रवी पाटील यांनी भेट घेत सांत्वन केले. तसेच जोपर्यंत या कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत संपूर्ण शिवसेना या कुटुंबियांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याची भावना या दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली आहे.
टिटवाळा येथून शिर्डीला जाणाऱ्या साई पालखीतील भावेश पाटील, रविंद्र उर्फ सुरेश पाटील आणि साईराज भोईर या तिघा साई भक्तांना भरधाव गाडीची धडक बसली होती. घोटी - सिन्नर येथे झालेल्या या अपघातात या तिघांना आपला जीव गमावावा लागला. यातील रविंद्र आणि भावेश हे चुलतभाऊ असून रिक्षा चालवून उदरनिर्वाह करणाऱ्या रविंद्रचा संसार उघड्यावर आला आहे. याबाबत माहिती समजताच शिवसेनेचे कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार विश्वनाथ भोईर आणि कल्याण शहर प्रमुख रवी पाटील यांनी आज या तिन्ही कुटुंबियांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले.
यावेळी इतकी गंभीर घटना घडूनही पोलिसांनी संबंधित गाडी चालकाला अद्याप कोणतीही कारवाई न केल्याची माहिती पाटील कुटुंबीयांनी आमदार विश्वनाथ भोईर आणि शहरप्रमुख रवी पाटील यांना दिली. तसेच याप्रकरणी आम्हाला न्याय मिळवून देण्याचे साकडेही या दोन्ही कुटुंबीयांनी यावेळी घातले.
त्यावेळी बोलताना आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले की शिवसेना संपूर्णपणे या कुटुंबियांच्या पाठीशी ठामपणे उभी असून त्यांचा संसार उघड्यावर येऊ देणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून या कुटुंबाला निश्चितच न्याय दिला जाईल असेही आमदार भोईर यांनी स्पष्ट केले.
तर या अपघातात त्यांची तरुण मुलांचे निधन झाले असून पाटील कुटुंबीयांचे हे दुःख खूप मोठे आहे. याप्रकरणी पोलिसांनी मुख्य गाडी चालकाऐवजी वेगळ्याच व्यक्तीला अटक केली आहे. यामुळे संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी आम्ही या कुटुंबाला सर्वतोपरी मदत करणार आहोत. तसेच त्यांच्या लहान मुलांच्या पुढील शिक्षणाचा खर्च तसेच पुढील जबाबदारी शिवसेना कल्याण शहर शाखेतर्फे उचलण्यात येणार असल्याची ग्वाही शहरप्रमुख रवी पाटील यांनी यावेळी दिली.
यावेळी विजय देशेकर, अंकुश जोगदंड, बबलेश पाटील, सुजित रोकडे, सूरज खानविलकर, चेतन म्हामुणकर, चेतन कबरे तसेच मोठ्या संख्येने शिवसेना पदाधिकारी आणि गावकरी उपस्थित होते.

# ठाण्यात ६० वर्ष जुन्या इमारतीच्या गॅलरीचा भाग कोसळला-२ दुकाने, ७ सदनिका केल्या खाली





ठाणे - ठाण्याच्या संकल्प सोसायटी, पुष्कराज इमारतीच्या जवळ, बेडेकर विद्या मंदिरच्या बाजूला, लक्ष्मी निवास समोर, नौपाडा, येथील संकल्प सोसायटी तळ अधिक दोन आणि टेरेस रूमची इमारत ६० वर्षे जुनी आहे. ती पालिकेच्या सी -२ बी या प्रवर्गातील आहे. या इमारतीच्या पहिला मजल्यावरील गॅलरीचा भाग कोसळला. पालिका पथकाने २ दुकाने आणि ७ सदनिका खाली केल्याची कारवाई केली.
संकल्प सोसायटीच्या पहिला मजल्यावरील गॅलरीचा भाग पडला असून, उर्वरित इमारत अत्यंत धोकादायक स्थितीमध्ये आहे. घटनास्थळी उप-आयुक्त परिमंडळ-०२ , नौपाडा-कोपरी प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, पिकअप वाहनासह, अतिक्रमण विभाग, पाणीपुरवठा विभागाचे व महावितरणचे कर्मचारी उपस्थित होते सदर घटनेत कोणालाही दुखापत नाही. संकल्प सोसायटी इमारत रिकामी इमारतीत राहणारे रहिवाशी यांचे नातेवाईकांकडे स्थलांतर करण्यात आले. पालिका पथकाने तळ मजल्यावरती असणारे दोन्ही दुकाने रिक्त. केली. इमारतीमध्ये राहणारे ७ रहिवाशांनी स्वतःची राहण्याची व्यवस्था आपल्या नातेवाईकांकडे केली. तसेच इमारतीमधील

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- ACC-III/८५३/२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- राजाराम एज्युकेशन सोसायटी
एफ/१९७६९/ठाणे, दि. २४/०८/२०१०
अर्जदार :- श्री. नारायण आप्पा अंदाडे
सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - ३, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. नारायण आप्पा अंदाडे
२) श्री. महादू पांडूरंग अंदाडे
३) कु. अभिजित नारायण अंदाडे
४) सौ. गुलाब दुंदा डिंगोरे
५) सौ. हिराबाई वसंत जाधव
६) कु. अनिता लक्ष्मण अंदाडे
७) कु. रुपेश भाऊ अंदाडे
तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.
१) श्री. नारायण आप्पा अअंदाडे
२) श्री. महादू पांडूरंग अंदाडे
३) कु. अभिजित नारायण अंदाडे
४) सौ. गुलाब दुंदा डिंगोरे
५) सौ. हिराबाई वसंत जाधव
६) कु. अनिता लक्ष्मण अंदाडे
७) कु. रुपेश भाऊ अंदाडे
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १८/०७/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- ACC-III/८५२/२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- राजाराम एज्युकेशन सोसायटी
एफ/१९७६९/ठाणे, दि. २४/०८/२०१०
अर्जदार :- श्री. नारायण आप्पा अंदाडे
सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - ३, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. नारायण आप्पा अंदाडे
२) श्री. महादू पांडूरंग अंदाडे
३) कु. अभिजित नारायण अंदाडे
४) सौ. गुलाब दुंदा डिंगोरे
५) सौ. हिराबाई वसंत जाधव
६) कु. अनिता लक्ष्मण अंदाडे
७) कु. रुपेश भाऊ अंदाडे
तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.
१) श्री. नारायण आप्पा अंदाडे
२) श्री. महादू पांडूरंग अंदाडे
३) कु. अभिजित नारायण अंदाडे
४) सौ. गुलाब दुंदा डिंगोरे
५) सौ. हिराबाई वसंत जाधव
६) कु. अनिता लक्ष्मण अंदाडे
७) कु. रुपेश भाऊ अंदाडे
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १८/०७/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- ACC-III/८५१/२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- राजाराम एज्युकेशन सोसायटी
एफ/१९७६९/ठाणे, दि. २४/०८/२०१०
अर्जदार :- श्री. नारायण आप्पा अंदाडे
सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - ३, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. नारायण आप्पा अंदाडे
२) श्री. महादू पांडूरंग अंदाडे
३) कु. अभिजित नारायण अंदाडे
४) सौ. गुलाब दुंदा डिंगोरे
५) सौ. हिराबाई वसंत जाधव
६) कु. अनिता लक्ष्मण अंदाडे
७) कु. रुपेश भाऊ अंदाडे
तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.
१) श्री. नारायण आप्पा अंदाडे
२) श्री. महादू पांडूरंग अंदाडे
३) कु. अभिजित नारायण अंदाडे
४) सौ. गुलाब दुंदा डिंगोरे
५) सौ. हिराबाई वसंत जाधव
६) कु. अनिता लक्ष्मण अंदाडे
७) कु. रुपेश भाऊ अंदाडे
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १८/०७/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.

# मो.ह.विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा




ठाणे : जनरल एजुकेशन इंस्टिट्यूटचे मो.ह.विद्यालय व अभिरूची मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला.

अभिरुची मंडळ ही आजी-माजी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या उत्कर्षासाठी १९७५ ला स्थापन केलेली संस्था आहे. हे वर्ष संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे.

या प्रसंगी शाळेतील आजी शिक्षिका उपप्राचार्या अनुराधा कुलकर्णी, माजी शिक्षिका विजयालक्ष्मी धडके तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सुनील काठे यांना आदर्श पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. अतुल वालावलकर यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून ज.ए.ई दादर या संस्थेचे कार्याध्यक्ष शैलेन्द्र साळवी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मनीषा कुलकर्णी यांनी केले. आभार कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास अभिरुची मंडळाचे अध्यक्ष रवींद्र तामरस, संस्थेचे पदाधिकारी, माजी शिक्षक, माजी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका माया बेंद्रे यांनी केले.

# झोपडपट्ट्यांचा विकास झालाच पाहिजे मात्र शासनाने पुनर्विकास करावा

नवी मुंबई : लोकनेते आमदार गणेश नाईक यांचा आज ऐरोली येथील भाजपा जनसंपर्क कार्यालयात जन सुसंवाद पार पडला. त्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने नागरिकांनी निवेदने दिली. यापैकी अनेक निवेदनांवर तात्काळ कार्यवाही करत नागरिकांना दिलासा देण्यात आला. उर्वरित निवेदनांवर कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. गाव, गावठाण, शहर, झोपडपट्टी परिसर, औद्योगिक परिसर, एलआयजी, एमआयजी, सोसायट्या सर्वच भागातील नागरिकांनी आपल्या समस्या आणि अडचणी मांडल्या. पाणीपुरवठा, वीज पुरवठा, आरोग्य, शिक्षण इत्यादी समस्यांच्या निवेदनांचा निपटारा करण्यात आला.



- गरजेपोटीची बांधकामे मालकी हक्क देऊन नियमित करावीत
- लोकनेते आ. गणेश नाईक यांची आक्रमक भूमिका
- जनसंवाद उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रसिद्धी माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबईमध्ये गरजेपोटी बांधलेली सर्व प्रकारची बांधकामे नियमित करण्याची तसेच झोपडपट्ट्यांचा विकास शासनाच्या माध्यमातून करण्याची मागणी केली. नवी मुंबईची निर्मिती करण्यासाठी येथील प्रकल्पग्रस्तांनी आणि स्थानिकांनी कवडीमोल भावात त्यांच्या जमिनी सिडकोला दिल्या.

नियमानुसार गावठाण विस्तार योजना सिडकोने राबवली नाही. साडेबारा टक्क्यांची योजना पूर्ण केली नाही. काळाच्या ओघात कुटुंबाचा विस्तार झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी राहण्यासाठी घरे आणि उदरनिर्वाहासाठी वाणिज्य बांधकामे केली. आज पर्यंतची अशा प्रकारची सर्व बांधकामे नियमित करावी. प्रकल्पग्रस्तांना घरांचा आणि त्या खालील जमिनीचा मालकी हक्क द्यावा. प्रकल्पग्रस्तांच्या हिताची त्यांना पाहिजे तशी योजना जाहीर करण्याची मागणी केली.

नवी मुंबईतील झोपडपट्ट्यांमधून राहणाऱ्या नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना हक्काचे आणि पक्के घर मिळण्यासाठी झोपडपट्ट्यांचा विकास झालाच पाहिजे, या मतांचे आम्ही आहोत. नवी मुंबईतील झोपडपट्टी वासियांना त्यांच्या घरांची आणि त्याखालील जमिनीची मालकी द्यावी. शासनाने स्वतः म्हाडाच्या धर्तीवर झोपडपट्ट्यांचा विकास करावा, अशी मागणी त्यांनी केली. योजनेतील पात्र,अपात्रतेबाबत स्पष्टता हवी. सोयी सुविधांबाबत शहरांमधील संतुलनही राहिले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेला

# केंद्र शासनाच्या मिठागर विभागाच्या जमिनी हस्तांतरित करा

## खा. नरेश म्हस्के यांनी लोकसभेत उठवला आवाज

नवी दिल्ली : मिरा भाईंदर महापालिकेच्या विकासात मोठा अडथळा ठरत असलेल्या केंद्र सरकारच्या मिठागर विभागाच्या जमिनीचा मुद्दा आज ठाणे लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांनी लोकसभेत 'शून्य प्रहरा'त उपस्थित केला.



मीरा भाईंदर महापालिकेच्या हद्दीत केंद्र शासनाच्या मिठागर विभागाची जमिन मोठ्या प्रमाणात आहे. या जमिनी पालिकेकडे हस्तांतरित होण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केंद्राकडे प्रस्तावही पाठवला आहे. मात्र पाठपुरावा करून सुद्धा त्यावर कोणताही निर्णय झालेला नाही. या जमिनीमुळे प्रस्तावित रस्ता रुंदीकरण, प्रस्तावित नवीन रस्ते, प्रस्तावित नवीन स्टेडियमचे काम रखडले आहे. जमीन हस्तांतरित न झाल्याने शहराचा विकास खुंटला असल्याची बाब नरेश म्हस्के यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

जमीन हस्तांतरणासाठी मिरा-भाईंदर महापालिका, राज्य शासन आणि केंद्र शासन यांची एक संयुक्त बैठक होणे गरजचे होते. मात्र आद्यप अशी बैठक झाली नसल्याबद्दल नरेश म्हस्के यांनी आपल्या भाषणात खंत व्यक्त करत तातडीने ही बैठक आयोजित करण्याची मागणी सभापतींकडे केली.

सभापती संध्या रे यांनी विकासकाचा मुद्दा सभागृहात मांडण्यासाठी वेळ दिल्याबद्दल त्यांचे खा. नरेश म्हस्के यांनी आभार मानले.

## पोलिसांना सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांच्या संरक्षणात अडकवले तर

# नागरिक सुरक्षित कसे राहणार?

ठाणे (गणेश भोईटे) : रोड सेफ्टी नावाचा प्रकारच सध्या अस्तित्वात राहिलेला नाही. सुमारे ८००-८०० पोलिसांना संरक्षणात गुंतवून ठेवले आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहतुकीचे नियोजन होणार कसे? मग, हीट अँड रन होणार नाही तर काय? वरून पोलिसांना गुन्हा दाखल न करण्याचे आदेश येणार; अशा स्थितीत सामान्य नागरिक कसे काय सुरक्षित राहणार? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला. पुणे, वरळीनंतर मुलुंडमध्ये हिट अँड रन झाला आहे. याबाबत पत्रकारांनी विचारले असता डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी हे प्रश्न उपस्थित केले.

### डॉ.जितेंद्र आव्हाड यांचा सवाल

डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, हल्ली पीए, कार्यकर्ते पोलिसांवर दबाव टाकून गुन्हा नोंदवावा किंवा नोंदवू नये, असे आदेश देत आहेत. पुणे, वरळीत राजकीय हस्तक्षेप झाला होता. आता मुलुंड प्रकरणात गुन्हाच दाखल केला जात नव्हता. एकीकडे कोणाला एमपीडीए लावायचा, कुणाला तुरूंगात टाकायचे, यासाठी फोन केले जातात. चौकशी पारदर्शक होत नाही. गुन्हेगार वाचविले जातात. मग, काही होत नाही म्हणून मग्रुरी येते अन् गुन्हे वाढत जातात. हे थांबले पाहिजे. पण, आता सरकारमधील मंत्रीच ठोकून काढण्याचे आदेश देत आहेत. म्हणजेच आता आम्हाला चिलखत, शिरस्त्राण, पॅड बांधूनच बाहेर पडावे लागणार आहे. पण, आता दोन महिन्यानंतर व्यवस्था बदलणार आहे. या लोकांनी केलेली गद्दारी जनता मोडून काढणार आहे. जनता या लोकांना क्षमा करणार नाही, असे ते म्हणाले.

### शरद पवारांवर भ्रष्टाचाराचे आरोप करताना अंतर्मनात बघावे

शरद पवार यांच्यावर आरोप करणाऱ्या अमित शहा यांनी आरशात बघावे; आपल्या मागे पूर्ण मंत्रिमंडळातील सदस्य उभे करावेत. मग, समजेल भ्रष्टाचाराचा सरदार कोण आहे ते! ईडी, सीबीआय वापरून पक्ष कसे फोडले, ७० हजार कोटींचा आरोप कोणावर झाला होता अन् सध्या ते कुठे आहेत? हे त्यांनी जाहीर करावे. शरद पवार या नावावर टीका केल्याशिवाय आपले अस्तित्व दाखवता येत नाही, हे अमीत शहा यांनाही उमगले आहे. याच शहा यांनी इलेक्ट्रोल बाँड, सीबीआय यावरही कधीतरी बोलावे, असे डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### हे कसले शिवभक्त? हे तर दरोडेखोर

विशाळगड आणि गजापूर दंगलीबाबतही डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी शासन - प्रशासनाला खडे बोल सुनावले. स्थानिकांनी तहसीलदार, पोलीस प्रशासनाला कळवूनही पोलीस बंदोबस्त देण्यात आला नाही. त्यामुळे स्वतः ला शिवभक्त म्हणवून घेणाऱ्यांनी आधी गडावर जाऊन धिंगाणा घातला अन् त्यानंतर गजापूरात पोलीस अधीक्षकांच्या समोरच लूटमार केली. विशाळगडावरील वास्तव्यात छत्रपती शिवाजी महाराज यांनीही मशिदीशेजारी मुक्काम केला होता. अन् त्यांच्या नावाने दंगल पसरविली जात आहे. ही दंगल पसरवणारे कसले शिवभक्त ते तर दरोडेखोर आहेत.

आरक्षणाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शरद पवारांची भेट घेत आहेत, याबाबत विचारले असता, शरद पवार हे देशातील सर्वात प्रगल्भ आणि परिपक्व नेते आहेत. ते मानव हिताचे राजकारण करीत आले आहेत. पवारांनी जातीपातीचे राजकारण कधीच केले नाही. पण, गेले दोन वर्षे या सत्ताधाऱ्यांनी दोन जाती एकमेकांशी भिडवल्या. त्यात यश न आल्याने त्यांनी आता हिंदू-मुस्लीम दंगल भडकावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, असेही डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले

# डोंबिवली 'एमआयडीसी'त बेकायदा बांधकामांचा सुळसुळाट

डोंबिवली : बेकायदा बांधकामांचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवलीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) क्षेत्रही सुटलेले नाही. फेज दोनमधील औद्योगिक तसेच अन्य सेवासुविधांसाठी आरक्षित असलेल्या ८९ एकर (३६.११ हेक्टर) जमिनी भूमाफियांनी गेल्या १५ वर्षांत गिळंकृत केली असून तेथे बेकायदा इमले, व्यापारी गाळे उभे राहिले आहेत.

### 'एमआयडीसी'कडून बघ्याची भूमिका

ही बेकायदा बांधकामे उभी राहत असताना 'एमआयडीसी' अधिकाऱ्यांनी तक्रारीच्या आधारे भूमाफियांना कामे थांबवायच्या नोटिसा पाठविली आणि नंतर बांधकामे उभी राहीपर्यंत केवळ बघ्याची भूमिका घेतली. तत्कालीन 'एमआयडीसी' अधिकाऱ्यांनी शांत राहणे पसंत केल्याचा गैरफायदा भूमाफियांनी घेऊन एकेक करून तब्बल ८९ एकर भूभाग गिळंकृत केला आहे. या बांधकामांमधून 'एमआयडीसी'सह शासनाला एका पैशाचाही महसूल मिळालेला नाही. उद्योजक विजय बामा भोईर यांनी बेकायदा बांधकामांची माहिती 'एमआयडीसी'कडून माहिती अधिकारात मिळविली आहे.

### तर अतिक्रमणे हटविणार एमआयडीसी

मोकळ्या आणि आरक्षित भूखंडावर बांधकामे करणाऱ्यांना नोटिसा पाठविण्याची कार्यवाही सुरू केल्याचे डोंबिवली एमआयडीसीचे अधीक्षक अभियंता भूषण हर्षे यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. काही बांधकामे हटविण्यात येत असून काहींना भूखंड रिकामे करून देण्याच्या नोटिसा पाठविल्याचे ते म्हणाले. भूखंड रिकामे करून दिले नाहीत तर, 'एमआयडीसी' अतिक्रमणांवर कारवाई करेल, असेही हर्षे यांनी स्पष्ट केले.

भूमाफियांनी उद्योजकांना बेघर करून ठेवल्याची परिस्थिती आहे. 'एमआयडीसी'त ट्रक टर्मिनल नाही. यासह अन्य सुविधांसाठी मुख्यमंत्री, उद्योगमंत्र्यांनी ८९ एकरांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी पुढाकार घ्यावा.
**-सदानंद थरवळ,** जिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे गट

'एमआयडीसी'मधील बेकायदा बांधकामे औद्योगिक क्षेत्राची मोठी डोकेदुखी आहे. या अतिक्रमणांमुळे सर्व सेवासुविधांवर ताण पडून नियोजन कोलमडून पडत आहे.
**-ॲड. श्रीरंग परांजपे,** रहिवासी

औद्योगिक, निवास क्षेत्रासाठी वाहनतळ, इतर सुविधांसाठी आरक्षणे आहेत. हे भूखंड हडप केले आहेत. या चुकीच्या नियोजनाने रहिवास क्षेत्र कंपनी परिसरात आले आहे. त्याचा त्रास उद्योजकांना सहन करावा लागतो.
**-देवेन सोनी** उद्योजक

'एमआयडीसी'च्या कागदपत्रांवरून हाती आलेल्या माहितीनुसार, सागाव, आजदे, सागर्ली, गोळवली गावांच्या हद्दीत सर्वाधिक बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत. ही बांधकामे करणाऱ्यांमध्ये या भागातील काही राजकीय नेत्यांचाही सर्वाधिक सहभाग आहे. एमआयडीसीचे ३४७.८८ हेक्टर क्षेत्रापैकी ८९.१९ एकरांवरील ३६ हून अधिक भूखंड उद्याने, बगीचे, मनोरंजन केंद्रे, क्रीडांगणांच्या आरक्षित भूखंडांसह मोकळ्या जागा भूमाफियांनी दहशतीच्या आधारे हडप केल्या आहेत. त्यावर बेकायदा टोलेजंग इमारती, व्यापारी गाळे बांधून बनावट कागदपत्रांच्या आधारे त्या ग्राहकांना विकल्या. काही ठिकाणी नाले बुजवून बेकायदा इमारती उभारण्यात आल्या आहेत. 'एमआयडीसी'च्या जमिनींवर ४४ धार्मिक स्थळे उभारून स्थानिकांनी आपले नियंत्रण प्रस्थापित केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून ही धार्मिक स्थळे तोडण्याची मोहीम 'एमआयडीसी'ने सुरू केली होती, मात्र स्थानिकांनी त्याला कडाडून विरोध केला.

औद्योगिक क्षेत्रातील पाच किमीचा बफर झोन यापूर्वीच काही राजकीय मंडळींनी बेकायदा इमले बांधून हडप केला. 'एमआयडीसी'तील महावितरण कार्यालय, सागर्ली, आजदे ते घरडा सर्कल परिसरातील मोठा भूभाग बेकायदा इमारतींनी व्यापला आहे. ८९ एकरचे गिळंकृत क्षेत्र 'एमआयडीसी'ने रिकामे केले तर मोठा भूभाग उद्योग व्यवसाय विस्तारासाठी उपलब्ध होईल, असे या क्षेत्रातील जाणकारांनी सांगितले.

# खातेअंतर्गत प्रमोशन रोखणाऱ्या सरकारवर ॲट्रोसिटी दाखल करा

- ठामपाच्या निवृत्त अभियंत्याची मागणी
- सेवेत असताना पदोन्नती न देण्यासाठीच निलंबन केल्याचा आरोप

ठाणे : अनुसूचित जातींच्या कर्मचाऱ्यांची पदोन्नतीत हस्तक्षेप करण्याचे तथा त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार केंद्र सरकारला आहेत. मात्र, राज्य सरकारने त्यामध्ये हस्तक्षेप करून अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांची बढती रोखली आहे. तसेच, सरकारच्या विरोधात भाष्य केल्याचा आरोप करीत आपणाला निलंबित करून मानसिक छळ करीत आर्थिक, सामाजिक प्रगती रोखली. त्यामुळे राज्य सरकारमधील जबाबदार मंत्र्यांवर ॲट्रोसिटी एक्टनुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रवींद्र चांगो शिंदे यांनी केली आहे.

रवींद्र शिंदे यांनी याबाबत पोलीस महासंचालकांना निवेदन दिले आहे. त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, ते ठाणे महानगर पालिकेच्या बांधकाम विभागात कार्यकारी अभियंते म्हणून कार्यरत होते. याच काळात कोविड आला होता. त्यावेळेस काही मंत्र्यांनी ठाणे शहरात झोपडपट्ट्यांमधील कोरोनाचा दर घसरला असून आता सोसायट्या काळजी घेत नसल्याने कोरोना वाढत असल्याचे म्हटले होते. त्यावेळेस रवींद्र शिंदे यांनी, सोसायट्यांवर आरोप करणे चुकीचे आहे, असे विधान समाजमाध्यमांवर केले होते. हाच धागा पकडून तत्कालीन ठामपा आयुक्त विपीन शर्मा यांनी शिंदे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्या नोटीसचा खुलासा केल्यानंतरही शिंदे यांना ४५ दिवस निलंबित करण्यात आले होते. परिणामी, त्यांना खातेअंतर्गत बढती मिळण्याचे मार्ग बंद झाले. ते उप नगर अभियंता म्हणून निवृत्त होऊ शकले नाहीत. तसेच, ४५ दिवसांच्या कालावधीत शिंदे यांना चौकशीच्या कारणास्तव अपमानित करण्यात येत होते. आपण केवळ अनुसूचित जातीचे असल्याने तत्कालीन मंत्री, उपमुख्यमंत्री, आयुक्त आणि गटनेते यांनी आपणावर अन्याय केल्याचा आरोप करीत या सर्वांवर अनुसूचित जाती - जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा; तसेच, आपण ही तक्रार केल्याने आपल्या जीविताला धोका निर्माण झाल्याने आपणाला संरक्षण पुरवावे, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, अनुसूचित जाती - जमातीच्या शासकीय कर्मचाऱ्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार हा केंद्र सरकारला आहे. बिहार उच्च न्यायालयानेही तसे आपल्या एका निकालात नमूद केले आहे. तरीही, राज्य शासनाने जाणीवपूर्वक बढत्या रोखल्या आहेत. हा प्रकार जातीयवादाने प्रेरित असल्याने याबाबत कारवाई करावी; अन्यथा, आम्ही १५ ऑगस्ट रोजी उपोषणास बसू, असा इशाराही रवींद्र शिंदे यांनी दिला आहे.



ठाण्यातील मानपाडा दोस्ती एम्पेरिया परिसरातील रस्त्यावर वाहनांची वर्दळ वाढली असतानाही या रस्त्याच्या दुतर्फी बेवारस वाहने आणि कचऱ्याचे साम्राज्य असते. चारच दिवसांपूर्वी भरधाव वाहनाच्या धडकेत एक वृद्ध पादचारी जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्युमुखी पडले होते. याविरोधात भाजपचे उपाध्यक्ष रमेश आंब्रे यांनी वाहतुक शाखेकडे तक्रार केली असुन या रस्त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासह गतीरोधक उभारण्याची मागणी केली आहे. (छाया : मनोज सिंह)

# पनवेल पालिकेच्या कंत्राटी कर्मचाऱ्याविरोधात पोलिसात तक्रार

पनवेल : नवीन पनवेल येथील कोंबडी विक्रेत्याला पनवेल पालिकेच्या धूर फवारणी करणाऱ्या कंत्राटी कामगाराने मारहाण केल्याची घटना रविवारी दुपारी घडली आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात कोंबडी विक्रेत्याच्या तक्रारीनंतर पनवेल महापालिकेच्या स्वच्छता विभागातील कंत्राटी कामगाराविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११५( २), ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रमोद बनकर असे या कंत्राटी कामगाराचे नाव आहे.

नवीन पनवेल येथील पंचशीलनगर झोपडपट्टीमध्ये संजय परमार यांच्या कोंबडी विक्रीच्या दुकानात ३२ वर्षीय अन्वर शेखर हे काम करतात. रविवारी दुपारी एक वाजता अन्वर हे दुकानात असताना कचरा घेऊन जाणारी घंटागाडी तेथे आली. अन्वर यांनी दुकानातील कचरा घंटागाडीत टाकताना त्याच ठिकाणी धूर फवारणी करणारा प्रमोद बनकर हा काम करत होता. अन्वरने कोंबडीची गाडी रस्त्यालगत उभी केल्याने कोंबड्यांची गाडी पुढे घेण्यावरुन भांडणे झाली. या भांडणात अन्वरला प्रमोदने सुरुवातीला शिविगाळ व मारहाण केली. मारहाणीनंतर कोंबडी दुकानाचे मालक संजय परमार यांना अन्वरने घडलेला प्रकार सांगितल्याने पुन्हा प्रमोदने अन्वरला मारहाण केल्याचे अन्वरने पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याबाबत पालिकेचे स्वच्छता विभागातील अधिकाऱ्यांना विचारले असता प्रमोद हा पालिकेचा कंत्राटी कामगार असला तरी तोही पंचशीलनगर याच परिसरात राहणारा असून अन्वर शेख आणि प्रमोद यांच्या वैयक्तिक वादावरुन ही घटना घडली आहे. त्यामुळे या घटनेचा आणि पालिकेच्या कारभाराचा काही संबंध नसल्याचे अधिकाऱ्यांनी नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर स्पष्ट केले.

# सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्याने लोकल सेवा विस्कळीत

## कामाच्या पहिल्याच दिवशी लोकलचा गोंधळ असल्याने प्रवासी संतप्त

कल्याण : मध्य रेल्वेच्या कल्याण रेल्वे स्थानका जवळ सोमवारी सकाळी चाकरमान्यांच्या कामावर जाण्याच्या पहिली दिवशी सिग्नल यंत्रणेत बिघाड झाला. यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि कसारा, कर्जतकडे जाणारी लोकल सेवा पूर्ण विस्कळीत झाली. लोकल सेवा विस्कळीत झाल्याने कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकांमध्ये प्रवाशांची गर्दी उसळली. अनियमित वेळेने लोकल धावत होत्या. इंडिकेटरवर शून्य वेळ लावण्यात आली होती. त्यामुळे रेल्वे स्थानकात कोणती लोकल, कधी येणार याची कोणतीही माहिती प्रवाशांना मिळत नव्हती. रेल्वेकडून फक्त सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्याने लोकल सेवा विस्कळीत झाल्याची माहिती दिली जात होती.

- सोमवार कामावर जाण्याचा पहिलाच दिवस. त्यात लोकल सेवेत गोंधळ उडाल्याने प्रवासी संतप्त झाले होते. यामध्ये महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी सर्वाधिक अस्वस्थ होते. अनियमित वेळेत असलेली एखादी लोकल कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकात आली की अगोदर प्रवाशांनी तुडुंब भरून आलेल्या या लोकलमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची झुंबड उडत होती. कसारा, कर्जतकडे जाणारे नोकरदार, भाजीपाला विक्रेते स्थानकांमध्ये अडकून पडले होते.
- रात्रभर कोसळणाऱ्या पावसाने थोडी उसंत घेतल्याने फलाटावरील प्रवासी निश्चिंत होते. बहुतांशी सर्वच रेल्वे स्थानकातील फलाटांवर रेल्वेने निवार वाढविणे, रूंदीकरण, नवीन जिन्याची कामे केली आहेत. त्यामुळे रेल्वे स्थानकांमध्ये पावसाच्या पाण्याची गळती लागत आहे. फलाटावरही प्रवाशांना छत्री घेऊन, रेनकोट घालून उभे राहावे लागते.
- सोमवारी सकाळी कल्याण, डोंबिवली, कोपर, विठ्ठलवाडी, टिटवाळा, ठाकुर्ली रेल्वे स्थानकात गेलेल्या बहुतांशी प्रवाशांनी अर्धा ते एक तास लोकल येत नाही पाहून काहींनी रस्ते मार्गाने ओला, उबर, खासगी वाहनाने तर काहींनी घरी जाणे पसंत केले. लोकल सेवेतील गोंधळामुळे रस्ते मार्गावरील वाहतुकीत वाहनांची भर पडली होती.
- गेल्या महिनाभरातील अशाप्रकारे लोकल सेवा विस्कळीत होण्याची ही दुसरी घटना आहे. यापूर्वी भांडुप परिसरात रेल्वे मार्गात पाणी तुंबल्याने लोकल सेवा ठप्प झाली होती.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१